**प्रेसनोट** दिनांक –२३/०८/२०२२

**१) लोकसेवक श्री.राजेंद्र महादेव संखे, वय ५७ वर्षे, शिरस्तेदार, उप अधीक्षक, भुमी अभिलेख कार्यालय वसई, (वर्ग–३) २)कैलास वासुदेव जोगी, वय–४२ वर्षे, धंदा–एजंट, (खाजगी ईसम) ३)रमण जयवंत गोली, वय–५० वर्षे, धंदा–रिक्षा चालक, (खाजगी ईसम) यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पालघर यांनी घेतले ताब्यात**

| | | |
|---|---|---|
| १ | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/ घटक | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पालघर |
| २ | गुन्हा नोंद क्रमांक | पेल्हार पोलीस ठाणे, मिरा भाईंदर, वसई विरार पोलीस आयुक्तालय |
| ३ | कलम | भ्र.प्र.अधिनियम १९८८ (सुधारणा २०१८) चे कलम ७, ७(अ), १२ प्रमाणे |
| ४ | लोकसेवकाचे नाव व कार्यालय | १)आलोसे राजेंद्र महादेव संखे, वय ५७ वर्षे, शिरस्तेदार, उप अधीक्षक, भुमी अभिलेख कार्यालय वसई, (वर्ग ३)<br>२)कैलास वासुदेव जोगी, वय–४२ वर्षे, धंदा–एजंट, (खाजगी ईसम)<br>३)रमण जयवंत गोली, वय–५० वर्षे, धंदा–रिक्षा चालक, (खाजगी ईसम) |
| ५ | मागितलेल्या लाचेची रक्कम | ५०,०००/–रूपये. तडजोडीअंती ४५,०००/–रूपये. |
| ६ | स्विकारलेली लाचेची रक्कम | ३०,०००/– रुपये |
| ७ | थोडक्यात हकिगत | यातील तक्रारदार यांच्या सासऱ्यांचे जमिनीचे शासकिय मोजणीचे कागदपत्रे मिळणेसाठी तसेच मोजणीचे रिपोर्ट कोर्टात सादर करण्यासाठी आरोपीत क्र. २ जोगी यांनी आरोपीत क्र.१ लोकसेवक संखे यांचेकरिता ५०,०००/–रूपये लाचेच्या रक्कमेची मागणी केली. त्यामुळे तक्रारदार यांनी दिनांक २२/०८/२०२२ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पालघर कार्यालयात तक्रार दिली.<br>तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीचे अनुषंगाने दि.२२/०८/२०२२ रोजी केलेल्या पडताळणी कारवाईमध्ये तक्रारदार यांच्या कामासाठी आरोपीत क्र.२ यांनी आरोपीत क्र.१ यांचेकरिता ५०,०००/–रू.मागणी करून तडजोडी अंती ४५,०००/–रू. लाच स्विकारण्याचे मान्य केल्याचे व आलोसे क्र.१ यांनी त्यास संमती देवून लाचेची रक्कम स्विकारण्यास आरोपीत क्र.२ यास प्रोत्साहित करून सदर लाचेची रक्कम दिनांक २३/०८/२०२२ रोजी दुपारी १२:१७ वाजताच्या सुमारास रावजी चहा सेंटर, गौराई पाडा नाका, नालासोपारा पुर्व येथे आरोपीत क्र. ३ यांचेकरवी पंचासमक्ष स्विकारली असता नमुद सर्व आरोपीत लोकसेवक यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पालघर कार्यालयाचे सापळा पथकाकडून रंगेहाथ पकडण्यात आले आहे. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पालघर यांचेशी संपर्क करावा.

---


संपर्क पत्ता :– लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पालघर प. ४०१ ४०४.
संकेतस्थळ :– acbmaharashtra@mahapolice.gov.in
ई–मेल :– dypacbpalghar@gmail.com
ऑनलाईन तक्रार :– ––
ॲप्लीकेशन :– acbmaharashtra.net
टोल फ्री नं. :– 1064
दुरध्वनी क्रमांक :– 02525-297297
व्हॉट्स ॲप क. :– 9923346810

(नवनाथ जगताप)
पोलीस उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पालघर